# शहरी भागातील युवतींच्या जीवनशैली ग्रामीण युवतींवर पडणारा प्रभाव :- एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. तुळशीदास शामराव कोस**
स्व.नि.पा.वाघाडे महाविद्यालय सौंदड
Email - tulsidaskose@gmail.com
Mob.No. - 8788196620

---

**सूचक शब्द :**

जीवनशैली, बौध्दिक सोंदर्य, असुरक्षितता ,आर्थिक स्वातंत्र, मोबाईल, इंटरनेट

**अमूर्त :**

- ग्रामीण भागातील युवतींच्या जीवन जगण्याच्या पध्दतीमध्ये बदल होतांना दिसून येत आहे.
- शोधकर्त्याने अध्ययन करतांना प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा आधार घेतला आहे.
- या शोध निबंधातून ग्रामीण भागातील युवतींवर शहरी भागातील युवतींच्या जीवनशैलीचा काही प्रभाव पडतो का ? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.
- संशोधनकर्ता या शोध निबंधातून हे निष्कर्ष काढणार आहे की, शहरी भागातील युवतींची जीवनशैली ही ग्रामीण भागातील युवतींमध्ये कश्याप्रकारे बदल घडवून आणण्यास मदत होईल याचे स्पष्टीकरण करणार आहे.

---

**प्रस्तावना :**

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांना विशेष अधिकार प्राप्त होते. तिला सुख-शांती, धन –संपत्ती, भक्ती –शक्ती व ज्ञानाचे प्रतिक मानल्या जात होते. स्त्री सुंदरतेचे प्रतिक असल्याने प्रशंसेला पात्र होती. यात प्रामुख्याने गार्गी, मैत्रेची व अत्री इत्यादींचा उल्लेख करता येईल, मात्र मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. असे म्हटले जाते की, “ जो समाज स्त्रियांची अवहेलना करतो, तो समाज मागासलेला राहतो.” या स्थितीत मात्र स्वातंत्र्यानंतर (१९५०) हळूहळू बदल घडून आलेला दिसतो.

स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क व अधिकार याबरोबर शिक्षणाची समान संधी दिल्या गेली. हा कालखंड म्हणजे स्त्रीमुक्तीचा उष:काळ म्हणता येईल. “ स्त्रीमुक्ती आंदोलनामुळे मध्यम वर्गीय स्त्रिला आर्थिक स्वतंत्र मिळाले पण ती चंगळवादी बनली आहे. म्हणून या पुढील स्त्रीमुक्तीच्या लढयाच नेतृत्वही कष्टकरी स्त्रीलाच करावं लागणार आहे.” असे छाया दातार म्हणतात. यासाठी ग्रामीण भागातील युवतींना पुढे येऊन हे नेतृत्व आपल्या हाती घेतल्यास त्यांना विविध क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादन करता येईल. यासाठी शिक्षित युवतींनी संघटना निर्माण करून आत्मनिर्भर झाले पाहिजे. एक आत्मनिर्भर युवती आर्थिक प्रगती करून स्व:त चे आणि पर्यायाने समाजाचे जीवनमान उंचावू शकतो. त्यासाठी तिला जुने विचार त्यागून नवीन विचार आत्मसात करावे लागेल. वेळप्रसंगी जीवनशैलीत देखील बदल करावे लागेल.

प्रस्तुत शोधनिबंधात शहरी भागातील युवतींची जीवनशैली ही ग्रामीण भागातील युवतींची जीवनशैली बदल्यास कशी कारणीभूत ठरत आहे. याचा आढावा घेण्यात येईल.

**साहित्याचे पूर्णरावलोकन :**

प्राचीन भारतीय स्त्री अध्यात्मवादी असून ज्ञान –विज्ञान संपादन करून मोठं होण्याचे प्रयत्न करीत होती. कौटुंबिक जीवनात धर्म व अध्यात्माला विशेष महत्व होते. प्राचीन भारतीय समाजातील पती-पत्नी कर्तव्याबाबत दक्ष होते. एकमेकांमध्ये प्रेम व त्यागाची भावना होती. घटस्फोट किंवा काडीमोड यावर बंधने नव्हते तरी घटस्फोटाचे प्रमाण कमी होते समाजात प्रथा, परंपरा, रूढी इत्यादींचे प्राबल्य होते. प्राचीन भारतीय विदूषींकरीता ज्ञान एक अंतिम साध्य (Ultimate End) होते. स्त्रिया सक्षम असून देखील पुरुषांशी कधी स्पर्धा करीत नव्हत्या.

आधुनिक काळात ग्रामीण भागातील युवती शुध्दा शहरीभागातील युवतींप्रमाणे भौतिकवादी जीवन जगण्याला विशेष महत्व देत आहे. त्यामुळे तिच्या जीवनशैलीमध्ये बदल झाल्याचे दिसून येत आहे. प्रथा, परंपरा, श्रध्दा इत्यादींचे महत्व कमी झाले आहे. शिक्षण घेणे आर्थिक उन्नती करणे व भौतिक सुखसुविधांचा उपभोग घेणे यावर भर देत आहे. अध्यात्माला विशेष महत्व राहिले नाही. त्यांच्या जीवनशैलीत झालेल्या बदल्यामुळे विविहानंतर पती-पत्नीच्या संबधात वितुष्ठता येऊन विवाह संबंध संपुष्ठात येत आहेत. कुटुंबातील सदस्यांमध्ये धार्मिक गोष्टींचे व कर्मकांडाचे प्रस्थ कमी झाले आहे. ज्ञान अंतिम साध्य न राहता ऐहिक सुखाला महत्व देत आहेत. शिक्षण, विवाह इत्यादीमध्ये इंद्रिय सुख उपभोगण्यावर विशेष भर दिले जात आहे. यामुळे पती-पत्नीच्या कर्तव्य पालनावर सुध्दा परीणाम झाला आहे. आधुनिक काळात भारतीय संविधानाने दिलेले हक्क व अधिकार स्वातंत्र्य व शिक्षणाची समान संधी यांचा पुरेपूर वापर करून ग्रामीण भागातील युवती आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन जीवनशैलीमध्ये बदल घडवून आणत आहेत.

**जीवनशैली म्हणजे काय ?**

"जीवनशैली म्हणजे एखाद्या व्यक्ती समूह किंवा संस्कृतीची आवड(रुची), विचार,व्यवहार, व त्यासंबधीची उन्मुखता होय." जीवनशैली या शब्दाचा प्रथम वापर ऑस्ट्रीयाई मनोवैज्ञानिक अल्सेड एल्डर यांनी १९२९ मध्ये ' द केस ऑफ मिस् आर ' The case of Mr's R या पुस्तकात केली आहे. जीवनशैलीच्या व्यापक भावनेला " राहाणीमानाची स्थिती किंवा शैली " च्या रुपात १९६१ पासून वापरण्यात आली. जीवनशैली मूर्त किंवा अमूर्त कारकांना निर्धारित करण्याचे कार्य करते.

आधुनिक काळात औद्योगिकरणामुळे वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणत होऊ लागले. या वस्तूंचा वापर शहरी भागातील युवती आपल्या जीवनशैलीत करीत असतात. वाढत्या दळणवळणाच्या साधनांमुळे या वस्तू शहरातून ग्रामीण भागात येत असल्यामुळे तय्या वस्तूचा वापर करून ग्रामीण भागातील युवती सुध्दा आपली जीवनशैलीमध्ये बदल घडवून आणतांना दिसत आहे. तिच्या विचारात, आवडी-निवडीत व्यवहारात बदल होतांना दिसत आहे.

**शहरी भागातील युवतींच्या जीवनशैलीचा ग्रामीण भागातील युवतींवर पडणारा प्रभाव :**

शहरी भागातील संस्कृती ही ग्रामीण भागातील संस्कृतीपेक्षा भिन्न स्वरुपाची असते. त्यामुळे शहरी भागातील जीवनशैली आणि ग्रामीण भागातील जीवनशैली यामध्ये तफावत जाणवते.शहरी भागातील युवतींचे बोलणे चालणे, पोशाख, सौंदर्य, केसरचना, आवडी – निवडी इत्यादी चा प्रभाव कशाप्रमाणे ग्रामीण भागातील युवतीच्या जीवनशैलीवर पडत आहे.ते पुढील मुद्यांचे आधारे स्पष्ट करता येईल.

**१) आवडी- निवडीचा प्रभाव :**

**अ) खाण्यापिण्याच्या सवयीतील बदल :**

शहरी युवतींच्या खाण्यापिण्याच्या सवयींचा ग्रामीण भागातील युवतींवर खूप मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. पारंपारिक खाद्यपदार्था ऐवजी फास्ट फूड, जंक फूड, चायनीज, आईस्क्रीम इत्यादी चे आकर्षण वाढले आहे. यामुळे मॉल्स, मँकडोनाल्ड, KFC मध्ये जाणे पसंद केले जाते.

**ब) पोशाख वापरण्याच्या पध्दतीमधील बदल :**

महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या युवतींना गणवेशाचे बंधन नसतात पर्ययाने आप–आपल्या आवडी निवडीचे निरनिराळ्या रंगाचे,विविध आकाराच्या कपड्यांचा पेहराव करीत असतात. याचा परिणाम ग्रामीण भागातील युवतींवर पडत असतो. ते सुध्दा निरनिराळ्या रंगाचे जीन्स, विविध आकाराचे टॉंप, स्कर्ट, हॉट-पँट, बरमुडा इत्यादींचा पेहराव करीत असतात.

**क) केसरचनेतील बदल :**

शहरी भागातील युवती पार्लर मधून विविध प्रकारची केस रचना करून शाळा-कॉलेजात येत असतात.ग्रामीण भागातील युवती याचे अनुकरण करून चित्र-विचित्र आकाराची केसरचना करत असतात. जसे स्ट्रीट स्टाईल गोंधळ बॉब, शॉर्ट लेयर्ड बॉब, हॉलीवूड अपडेट, वेव्ही फ्रिंज, साईड, फ्रिंज इत्यादी.

**ड) सौंदर्य प्रसाधनांच्या वापरातील बदल :**

वयात येणाऱ्या प्रत्येक युवतीला भिन्न लिंगी युवकांचे आकर्षण असते. यासाठी विविध प्रकारचे फेसियल, क्रिम, पावडर इत्यादीच्या सर्रास वापर करतांना दिसतात. यात ग्रामीण भागातील युवती सुध्दा मागे नाहीत.ती सुध्दा विविध प्रकारचे फेसियल क्रिम, पावडर इत्यादीच्या वापर करून आपले सौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असते.

**२) विचारांचा प्रभाव :**

**अ) आधुनिकतेबाबत :**

शहरी भागात आधुनिकतेचे अनुकरण करणारा युवतींचा एक मोठा वर्ग आढळतो. फँशन, पार्टीज, इवेन्ट्स मध्ये सहभागी होणाऱ्या युवतीचे अनुकरण ग्रामीण भागातील युवती करीत असतात. यामुळे त्यांचाही एक वर्ग समाजात आहे. तो-त्या आर्थिक सामाजिक परिस्थितीतून आलेला आहे हिंदी सिनेमा व प्रसारमाध्यमामुळे ऐश्वर्या रॉय, सुस्मिता सेन विश्वसुंदरी बाह्य सोंदर्याला महत्व देणाऱ्या युवतींचा वर्ग वाढत चालला आहे.

**ब) करीअरच्या बाबत :**

शहरी मध्यमवर्गीय गरीब, श्रीमंत वेगवेगळ्या जातीतील तरुणींच्या मनोविश्वाचा अभ्यास करता काही फरक असल्याचे जाणवते अनेक युवती शिक्षण घेत आहेत. करिअर करीत आहेत. परंतु उच्च वर्गातील शहरातल्या मुली स्वत:च्या कुवतीवर किंवा लग्न करून पतीबरोबर परदेशात जाण्याची स्वप्ने पाहतात मात्र ग्रामीण भागातील गरीब, मध्यमवर्गीय युवती आपआपल्या कुवतीवर किंवा नौकरी करणाऱ्या पतीबरोबर शहरात जाण्याची स्वप्ने पाहतात. शिकलेल्या युवतींचा ओढा मुख्यत: आर्थिक स्वातंत्र्याकडे असल्याचे दिसते करिअर म्हणजे " आर्थिक स्वातंत्र्य " असे मानणाऱ्याही अनेक युवती आहेत.

**क) शिक्षणाबाबत :**

शहरी भागातील युवतीप्रमाणे ग्रामीण भागातील युवतींमध्ये शिक्षणाविषयीची जाणीव, जागृती व आकांक्षा निर्माण झाल्याचे दिसते स्वत:चे व्यक्तीमत्व निर्माण करण्यासाठी त्या धडपडत आहेत. शिक्षण, अर्थाजन, लग्न या सर्व बाबतीत कुटुंबावर अवलंबून राहावे लागत असल्याने असुरक्षितताही त्यांच्या मनामध्ये आहे.

**ड) विवाहाबाबत :**

पूर्वी विवाह एक धार्मिक व पवित्र संस्कार मानल्या जात होते. परंतु वाढत्या आधुनिकी करणामुळे विवाह पवित्र संस्कार न राहता तो एक सामाजिक करार झाला आहे. पुर्वी कुटूंबातील वडीलधारी व्यक्ती विवाह ठरवीत असत, ते आजही ठरवतात परंतु वाढत्या शिक्षणाबरोबर युवतींचे विचार व निर्णय घेण्याचे स्वातंत्र यात वाढ झाल्यामुळे स्वत:चा जोडीदार स्वत: निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र नसले तरी तिची पसंद – नापसंद, इच्छा – आकांक्षा इत्यादींचा विचार घेऊन वडीलधारी व्यक्ती विवाह ठरवीत असतात. हे चित्र शहरातील असले तरी त्याचे पडसाद ग्रामीण भागातील युवतींवर उमटत आहेत.

**३) राहणीमानाचा प्रभाव :**

शहरीभागातील युवतींचे राहणीमान ग्रामीण भागातील युवतींपेक्षा भपकेबाज असते. परिस्थिती नुरूप महागडे मोबाईल, इमिटेशन ज्वेलरी, सनग्लासेस, परफ्युम, घड्याळे, सौंदर्य प्रसाधने इत्यादी वापरत असतात.ग्रामीण भागातील युवतींमध्ये या सर्व वस्तूंचे आकर्षण असते. मनोरंजनाच्या साधनांमध्ये मोबाईल, इंटरनेट चा वापर शहरातील युवती करतांना दिसूनं येतात. हे जरी खरे असले तरी ग्रामीण भागातील युवती सुध्दा यामध्ये मागे नाही. ती सुध्दा या सर्व गोष्टींचा वापर करीत आहेत. यामुळे त्यांना सुध्दा आपल्या जीवनशैलीत पाहिजेत ते बदल घडवून आणण्यास मदत होत आहे. ज्यांच्या इच्छा – आकांक्षा पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होतात त्याच्यात न्यूनगंडाची भावना वाढीस लागतो.

**४) व्यवहाराचा प्रभाव :**

**अ) ऑनलाईन शॉपिंग विषयीची माहिती :**

आधुनिक काळात ऑनलाईन शॉपिंगचे महत्व वाढत आहे. ऑनलाईन शॉपिंगमध्ये युवतींचे वाढते स्वारस्य फक्त 'काहीतरी विकत घेणे ' यापुरते मर्यादित नाही. तिथे मिळणारी स्वत:ची डिजीटल स्पेस आणि निवडीचे स्वातंत्र्य यामुळे त्यांना ऑनलाईन खरेदी करायला आवडते. खरे तर या सर्वात महत्वाच्या आणि स्मार्ट ग्राहक असतात.याला ग्रामीण भाग देखील अपवाद राहिला नाही.ग्रामीण भागातील युवती सुध्दा ऑनलाईन शॉपिंग करतांना दिसत आहे. प्रचलित फँशनच्या नवनवीन वस्तू खरेदी करीत आहेत. या सुविधांमुळे त्यांना हव्या असलेल्या वस्तू घरपोच मागविता येतात.

**ब) ऑनलाईन चँटिंग विषयीची माहिती :**

आधुनिक काळात एकमेकांना परस्पर भेटणे कमी झाले असले तरी मोबाईल इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन चँटिंग, फेसबुक, ट्वीटर चा वापर करणे वाढले आहे. यामध्ये शहरी भागातील युवती आपला बराच वेळ घालवत असतात. याचा प्रभाव ग्रामीण युवतींवर शुध्दा पाहायला मिळतो.

**क) डेटिंग अँप्स विषयीची माहिती :**

डेटिंग अँप्स मदत घेऊन आपला जोडीदार शोधण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. स्टँस्ट्रीस्ट्रीक डिजीटल मार्केट ऑऊटलुक या जागतिक सर्वेक्षण संस्थेने नुकत्या जाहीर केलेल्या आकडेवारी नुसार २०२१ च्या अखेरीस डेटिंग

अँप्सची जगभरातील तब्बल ३ अब्ज २० अमेरिकन डॉलर्स एवढी आहे. अमेरिकेमध्ये अँप्सचे सर्वाधिक वापर केला जातो. भारतात डेटिंग अँप्स चा वापर कमी असला तरी भविष्यात मात्र याचे पडसाद ग्रामीण भागात देखील उमटू लागतील असे म्हणावयास हरकत नाही.

**ड) डिजिटल पेमेंट विषयीची माहिती :**

शहरीभागातील युवती डिजिटल पेमेंट करण्याविषयी जागृत आहेत. त्या कुठल्याही हॉटेल्सचे बिल देतांना डिजिटल पेमेंटचा वापर करतात.याचे परिणाम ग्रामीण भागातील युवतींमध्ये पाहायला मिळतो.जसे Google pay , Phone pay इत्यादींचा वापर त्या करतांना दिसतात.

**शिफारस :**

- फास्टफूड, जंकफूड इत्यादीमुळे वजन नियंत्रणात ठेवणे कठीण होते. वेळप्रसंगी आरोग्याची समस्या उद्भवत असते. त्यामुळे अशा पदार्थाचे सेवन कमी प्रमाणात करावे. जेणे करून आपले आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल.
- विविध रसायने युक्त सौंदर्यप्रसाधने वापरणे टाळले पाहिजे. त्याचा परिणाम त्वचेवर होण्याची शक्यता असते.
- बाह्य सौंदर्या बरोबरच बौध्दिक सौंदर्यालाही महत्व दिले पाहिजे.
- करिअर म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य असले तरी समाजात वावरतांना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्यायला पाहिजे.
- शिक्षण, अर्थाजन, लग्न या बाबतीत कुटूंबातील सदस्यांमध्ये(वडीलधारी व्यक्ती) सामंजस्य निर्माण केल्याने मनातील असुरक्षितता कमी होण्यास मदत होऊ शकतो.
- मोबाईल, इंटरनेट किंवा विविध तंत्रज्ञानाचा वापर करतांना सजग व जागृत राहावे. जेणे करून आपली फसवणूक होणार नाही.

**निष्कर्ष :**

शहरी भागातील युवतींच्या आवडीनिवडीच्या प्रभावाने ग्रामीण भागातील युवतींमध्ये पोष्टिक व संतुलित आहाराऐवजी फास्टफूड, जंकफूड इत्यादी खाद्य पदार्थाचे आकर्षण वाढून वजन वाढीची समस्या वाढत आहे. पारंपारिक वस्त्राऐवजी जीन्स, टॉप, स्कर्ट, बरमुडा इत्यादींचा सर्रास वापर होतांना दिसतो. केसरचनेत फँशनच्या नावावर विचित्र अशा पध्दती दृढ होतांना दिसतात. सौंदर्यप्रसाधनाच्या क्रीम मध्ये वेगवेगळ्या रसायनाचा वापर केल्याने चेहऱ्याच्या त्वचेवर परिणाम होत आहे. बौध्दिक सौंदर्यापेक्षा बाह्य सौंदर्याला विशेष महत्व दिले जात आहे. करिअर बाबत शिकलेल्या युवतींचा कल ,मुख्यत: आर्थिक स्वतंत्राकडे असल्याचे दिसते. शिक्षणाबाबत ग्रामीण भागातील युवतींमध्ये जाणीव-जागृती निर्माण झाल्याचे दिसते. याबरोबर शिक्षण, अर्थाजन, लग्न याबाबतीत असुरक्षितताही दिसून येते. जोडीदार निवडण्याच्या निर्णयामध्ये युवतींचा सहभाग वाढला आहे. महागडे मोबाईल, इमिटेशन ज्वेलरी, सनग्लासेस, परफ्युम, घड्याळे, ऑनलाईन शॉपिंग, चँटिंग, फेसबुक, ट्वीटर इत्यादीच्या वापरात वाढ झाली आहे. डेटिंग अँप्सच्या वापरा बद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

**संदर्भ :**


- डॉ.रवींद्रनाथ मुखर्जी : भारत मे सामाजिक परिवर्तन, विवेक प्रकाशन, दिल्ली.
- डॉ.रामनाथ शर्मा : परिवार और समाज, राजहंस प्रकाशन मंदिर, मेरठ
- शिवराज गोर्ले, सहलेखिका – जयश्री रावळेकर : स्त्री विरुध्द पुरुष ? राजहंस प्रकाशन प्रा.लि.पुणे
- ://www.weeklysadhana.in
- Maharashtra Times : 1 sep 2018
- https://goanvarta.net
- Lokmat news Network, 18 July 2021